जावक क्रंमाक ७(९ /२०१८
बंडगार्डन पोलिस स्टेशन पुणे शहर
दिंनाक- ०९/०२/२०१८

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.

पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे शहर,

यांना सविनय सादर की,

रिपोर्ट – एम. डी. बेंदुगडे पो. ना. १९६० बंडगार्डन पो. स्टे. पुणे शहर

याजंकडुन विंनती पुर्वक की,

विषय – बेवारस मयताची माहीती प्रसिध्दी माध्यमांना कळविणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, बंडगार्डन पो. स्टे. अकस्मात मयत रजि. नं. १८/२०१८ सी. आर. पी. सी. १७४ मधिल अनोळखी मयत पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे, नाव पत्ता माहीत नाही हा दि. ०२/०२/२०१८ रोजी १८/३० वा. चे सुमारास हॉटेल वैशाली समोर पुणे स्टेशन ब्रीजच्या भिंतीलगत बेशुध्द अवस्थेत मिळुन आलेने त्यास उपचार कामी तात्काळ सरकारी ॲम्बुलन्सने यादीसह ससुन हॉस्पीटल पुणे येथे आणले असता त्यास डॉक्टरानी एम.एल.सी. नं. २४०९/२०१८ अन्वये तपासले असता तो दि. ०२/०२/२०१८ रोजी १८/४५ वा. डॉक्टर तपासणीपुर्वी मयत झाला त्याचे वर्णन खालिलप्रमाणे-

एक अनोळखी मयत पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे, नाव पत्ता माहीत नाही चेहरा उभट, नाक सरळ, दाढी काळी पांढरी, उंची ५ बाय ६, रंगाने सावळा, अंगाने सडपातळ, डोकीचे केस पाढंरे वाढलेले, उजव्या हाताच्या पोटरीवर मराठीत माँ गणेश मोहन ननारे असे गोंदलेले आहे. अंगात कपडे नाहीत.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा मयत पुरुष वर नमुद ता. वेळी व ठिकाणी मिळुन आला असुन त्याचे नातेवाईकाचा तपास होणेकामी प्रसिध्दी माध्यमांना कळविणेस विंनती आहे.